ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२१ • रविवार दि.३१ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## शेतकरी कर्जमाफीची अंमलबजावणी आठवड्याभरात



- कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा
- नांदेडसह १४ जिल्ह्यांमध्ये थकबाकीचे प्रमाण सर्वाधिक

मुंबई/प्रतिनिधी-अवकाळी पाऊस, शेत पिकांचे पडते भाव ऐन मशागतीच्या काळात डिझल टंचाई सारख्या आस्मानी, सुलतानी संकटाला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची रखडलेली अंमलबजावणी येत्या ८ ते १० दिवसात करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज केली. खरीप हंगामाच्या तोंडावर अनेक संकटांना सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार हलका होण्याची आशा निर्माण झाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना भरणे यांनी ही माहिती दिली. त्यांच्या घोषणेमुळे राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.राज्य सरकारने यापूर्वी विधानसभेत ३० जूनपूर्वी कर्जमाफीचा लाभ देण्याचे आश्वासन दिले होते. शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यानंतर राज्याच्या अर्थसंकल्पातही यासाठी तरतूद करण्यात आली आहे.योजनेनुसार, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीक कर्जधारक पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.पीक कर्ज देण्याचा अधिकार असलेल्या सहकारी, राष्ट्रीयकृत किंवा इतर पात्र बँकांकडून घेतलेल्या कर्जांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे. तसेच शासनाच्या सूचनांनुसार ग्रीस्टॅक नोंदणी व केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पात्रता निश्चिती-साठी ही प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे.

**बँकांनाही होणार फायदा**

या कर्जमाफीमुळे केवळ शेतकरीच नव्हे तर ***पान ४ वर***

## शहरातील एसबीआय बँकेतून ग्राहकांचे ८० तोळे सोने लंपास

### दोन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टरलेन शाखेतून ग्राहकांनी तारण ठेवलेले ८० तोळे सोने लंपास करण्यात आले आहेत. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात बँकेच्या दोन अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाची शहरातील डॉक्टरलेन भागात शाखा आहे. या बँकेचे असंख्य ग्राहक असून दररोज बँकेत गर्दी असते. अनेक ग्राहकांनी बँकेकडे सोने तारण ठेवून कर्ज घेतले आहे. दि.२७ जून २०२५ ते १८ मे २०२६ या काळात ग्राहकांनी बँकेकडे तारण ठेवलेले ८० तोळे सोने बँकेचे कॅश इन्चार्ज आदित्य प्रकाश सेनगावकर व सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे यांनी संगनमत करुन लंपास केले. सदरील प्रकरण उघडकीस येवू नये म्हणून दोघांनी बँकेच्या लॉकरमध्ये ४१ तोळे बनावट सोने आणुन ठेवले होते. लंपास केलेल्या सोन्याची किंमत जवळपास ८५ लाख रुपये आहे. बँकेच्या तपासणीत हा प्रकार उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. एसबीआय बँकेचे डॉक्टरलेन शाखेचे मुख्य व्यवस्थापक राजीव कदम यांनी वजिराबाद पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन बँकेचे कॅश इन्चार्ज आदित्य सेनगावकर व सर्विस मॅनेजर जीवन जगदाळे यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम हे करीत आहेत.



नांदेड मनपाचे सेवानिवृत्त उपआयुक्त तथा नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सदस्य शशिमोहन नंदा यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना स.नौनिहालसिंघ जहागिरदार, स.रणजितसिंघ चिरागीया, ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर दिसत आहेत.

### जिल्ह्यात दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी

## विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. ३१ मे २०२६ रोजी दुपारी १३:१८ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ३१ मे २०२६ व दि.१ जून २०२६ या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. ३१ मे २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व दि.१ जून २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## मनोज जरांगे यांचे उपोषण अखेर मध्यरात्री सुटले

### मराठा आरक्षणासाठी सरकार कटिबद्ध-मुख्यमंत्री फडणवीस





मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी सुरू केलेले मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण अवघ्या एका दिवसात मागे घेण्यात आले. राज्य सरकारसोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर आणि मागण्यांबाबत ठोस आश्वासने मिळाल्यानंतर जरांगे यांनी रविवारी मध्यरात्री पाणी पिऊन उपोषण सोडले.

मराठा आरक्षणा संदर्भातील प्रलंबित मागण्यांसाठी भरउन्हात शेतात बाज टाकुन मनोज जरांगे पाटील शनिवारी सकाळी १० पासून आमरण उपोषणास बसले होते. उपोषणा दरम्यान मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मराठा आरक्षण अभ्यासक तसेच भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या सोबत चर्चा झाली. चर्चेनंतर सरकारने काही महत्त्वाच्या मागण्या मान्य केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर रात्री सुमारे १.१५ वा. ***पान ४ वर***

## परभणी-हिंगोलीतून ठाकरे सेनेकडून डॉ.विवेक नावंदर यांना उमेदवारी



परभणी/प्रतिनिधी-उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी डॉ. विवेक नावंदर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ही घोषणा शिवसेना नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे.


विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर परभणी-हिंगोली मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीत जागावाटपाबाबत अद्याप चर्चा सुरू असतानाच महाविकास आघाडीने मात्र आक्रमक भूमिका घेत उमेदवारांची घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानपरिषदेचे आमदार तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी एक्सवरील पोस्टद्वारे डॉ. नावंदर यांच्या उमेदवारीची घोषणा केली. महाविकास आघाडीत १७ पैकी सहा जागा ठाकरे गटाच्या वाट्याला आल्या असून, त्यामध्ये परभणी-हिंगोली मतदारसंघाचा समावेश आहे.डॉ. विवेक नावंदर हे ठाकरे गटाचे परभणी महानगरप्रमुख असून पक्ष संघटनेत सक्रिय भूमिका बजावत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे परभणी-हिंगोली मतदारसंघातील निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आंतरगाव नदी घाटावर पोलीस उपअधीक्षकांची धाड;७६ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मौजे आंतरगाव ता.नायगाव शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या रेतीचा उपसा सुरु होता. शनिवारी रात्री बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी धाड टाकुन ७६ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असून याप्रकरणी कुटुंर पोलीस ठाण्यात दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौजे आंतरगाव शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून सर्रासपणे रेती माफियांकडून रेतीचा अवैध उपसा सुरु होता. सदरील रेतीचा उपसा बंद करावा अशी मागणी आंतरगाव व परिसरातील नागरिकांनी केली होती. परंतु महसूल व संबंधीत पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. रात्रं-दिवस रेतीचा उपसा सुरु असलेल्या आंतरगाव नदी घाटावर बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली कुटुंर पोलीस स्टेशनचे पो.नि.अरविंद घोडके, फौजदार मल्लिकार्जुन कारामुंगे, फौजदार गजानन तोटेवाड व





पोलीस कर्मचाऱ्यांनी शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास धाड टाकली. नदीच्या पात्रातून रेतीचा अवैध उपसा सुरु होता. पोलीसांना बघुन रेती उपसा करणारे पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन एक हायवा, दोन ट्रॅक्टर, एक जेसीबी, दोन दुचाकी, सहा ब्रास रेतीचा साठा असा ७६ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. फौजदार गजानन तोटेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कुंटूर पोलीस ठाण्यात ***पान ४ वर***

## खुशी स्टोन क्रेशरमुळे शेतकऱ्यांचे जगणे असाह्य;पिकांचेही मोठे नुकसान

### लहाने कुटुंबाचा ३ जूनपासून उपोषणाचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-निसपूर शिवारातील परंतु राजगड गावशेजारी चालू असलेल्या 'खुशी स्टोन क्रेशर' मधून निघणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या नाकीदम आल्याने शेवटी लहाने परिवाराने ३ जून पासून शेतावरच उपोषणाचा इशारा दिला आहे. धुळीमुळे शेती उत्पादनावर अनिष्ट परिणाम. पर्यावरण प्रदुषित झाल्याने आरोग्य विषयक समस्यांचा धोका लक्षात घेता ग्रामपंचायतीनेही नोटीस बजावली आणि शेतकऱ्याने सुद्धा राज्याच्या प्रदुषण नियंत्रण मंडळासह संबंधितांकडे कैफियत मांडली. भ्रष्ट यंत्रणेकडून शेतकऱ्यांच्या मागणीला केराची टोपली आणि 'स्टोन क्रेशर' ला चालना दिल्यामुळे आंदोलनाचा पवित्रा घेतलाय. या उलथापालथीतून प्रकरण कोणत्या निर्णयावर पोहोचणार याकडे सर्वांचे लक्ष लागून असल्याचे दिसते.

निसपूर येथील पंजाबराव लहाने यांच्या शेतशिवारालगत 'खुशी स्टोन क्रेशर' चालू आहे.क्रेशर चालविण्यासाठी आणि गिट्टी निर्मितीसाठी आवश्यक लागणारा दगड मिळवण्यासाठी खदान, वगैरे वगैरेंची पुर्तता करूनच क्रेशर चालवली जात असतील यावर शंका घेण्यासाठी वाव मिळणारा प्रकार मांडवी मंडळातील लिंगी परिसरात नियोजित 'स्टोन क्रेशर' ला विज पुरवठा करण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांवर केलेली दादागिरी हे उदाहरण पुरेसे ठरेल.



शेतकऱ्यांच्या रेट्यामुळे पोलीस कारवाई झाली आणि नांगी टाकली अन्यथा अशीच दादागिरी सहन करावी लागली असती असा पश्चाताप लोकांनी व्यक्त केलाय. महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळासह सर्वच विभागाच्या परवानग्या आणि मुद्दती अखेर पुन्हा मुद्दत खदान परवाना देताना प्रशासन नागरिकांच्या तक्रारींची मुळीच दखल घेत नाही हा त्याचा परिपाक म्हणता येईल. प्रशासनाच्या क्रेशर धार्जिण्या प्रवृत्तीला लगाम लावण्यासाठी पंजाब लहाने, विठ्ठल लहाने, प्रदीप लहाने यांनी ३ जून पासून त्यांच्या शे.स.नं.८४ मध्ये उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. 'स्टोन क्रेशर' च्या धूळीच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार का ?, त्यांच्या शेतातील पिकांच्या उत्पादनावर विपरीत होणारा परिणाम? ह्या बाबी प्रशासन विचारात घेणार की नाही ? हा मुद्दा या निमित्ताने समोर आला आहे.

## नांदेडमध्ये हलका पाऊस

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या काही दिवसांपासून उन्हामुळे लाही-लाही होत असलेल्या नांदेडकरांनी आज हलक्या पावसाच्या सरीचा आनंद लुटला.

गेल्या महिनाभरापासून संपुर्ण राज्य व देशात उष्णतेची लाट उसळली आहे. नांदेडचे तापमानही दिवसेंदिवस ४० पार जात होते. कडक ऊन्हामुळे पावसाळा कधी सुरु होतो याची प्रतिक्षा असतांनाच आज सकाळपासून कडक उन्ह दुपारी साडेतीन नंतर मात्र वातावरणात अचानक बदल झाला. ढगाळ वातावरण सर्वत्र निर्माण झाले होते. अनेक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या.

# पोलिसांच्या तत्परतेमुळे महिलेचे दोन तोळ्याचे सोन्याचे गंठन परत

माहूर/प्रतिनिधी-देव तारी त्याला कोण मारी या म्हणीचा प्रत्यय देणारी घटना माहूर तालुक्यात घडली असून, बसमधून हरवलेले तब्बल दोन तोळ्यांचे सोन्याचे गंठण पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे अवघ्या काही वेळात शोधून काढण्यात आले. अंदाजे तीन लाख रुपये किँमतीचे हे गंठण परत मिळाल्यानंतर महिला प्रवाशाच्या डोळ्यांत अक्षरशः आनंदाश्रू तरळले.



यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथील एक महिला माहूर गडावरील दत्तशिखर दर्शन आटोपून वाई बाजारजवळील मदनापूर येथे नातेवाईकांकडे जाण्यासाठी माहूर बसस्थानकावरून अमरावती-किनवट बसमध्ये प्रवास करत होती. बसमध्ये चढताना तिच्या गळ्यात दोन तोळ्यांचे सोन्याचे गंठण होते. मात्र वाई बाजार येथे उतरण्याच्या तयारीत असताना अचानक तिच्या लक्षात आले की गळ्यातील गंठण गायब झाले आहे.क्षणातच महिलेने आक्रोश करत जोरजोरात रडण्यास सुरुवात केली. बसस्थानक परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी वाई बसस्थानकाजवळ उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव, निवृत्त आरोग्य कर्मचारी रमेश गावंडे, सामाजिक कार्यकर्ते विनोद राठोड, निखिल जाधव आणि अत्रिनंदन शिंदे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती हाताळली. संबंधितांनी बस वाहकाला विनंती करून बस थांबवून ठेवली तसेच सिंदखेड येथील ठाणेदार रमेश जाधवर यांना संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाली सुरू करत बस पुढे जाऊ न देण्याचे आदेश दिले. काही वेळातच पोलीस निरीक्षक रमेश जाधवर आणि वाई बाजार बिटचे जमादार चव्हाण घटनास्थळी दाखल झाले. यानंतर पोलिसांनी बसमधील सर्व प्रवाशांची कसून तपासणी आणि अंगझडती घेतली. सुरुवातीला काहीही हाती लागत नसल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले होते. मात्र अखेर बसच्या शेवटच्या सीटजवळ सोन्याचे गंठण आढळून आले आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला.विशेष म्हणजे संबंधित महिला बसच्या पुढील भागात बसलेली होती. त्यामुळे बसमधील काही संशयित महिलांनी चोरी केल्यानंतर पोलिस बसमध्ये चढल्याचे पाहून भीतीपोटी ते गंठण मागील बाजूस फेकून दिले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे पोलिसांची तत्परता, स्थानिक नागरिकांची सामाजिक बांधिलकी आणि वेळेवर घेतलेली दखल यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. लाखो रुपयांचे दागिने सुखरूप परत मिळाल्याने संबंधित महिलेने पोलिस आणि मदतीला धावून आलेल्या नागरिकांचे अश्रूभरल्या डोळ्यांनी आभार मानले.

# अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा एलसीबीने केला जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी विष्णुपुरी कमानी जवळ शनिवारी रात्री पकडला असून या प्रकरणी एका जणास अटक करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचारी हे शनिवारी रात्री गस्त घालीत असतांना काळेश्वर मंदिर परिसरातील नदीच्या पात्रातून उपसा केलेली रेती हायवामध्ये टाकुन घेवून जात असतांना पोलीसांनी विष्णुपुरी कमानीजवळ हायवा क्र.एमएच २६ बीई-०१०१ हा पकडला. त्यामध्ये पोलीसांना पाच ब्रास रेतीचा अवैध साठा आढळून आला. रेती वाहतुकी विषयी वाहन चालक लंकेश केशव गायकवाड याच्याकडे चौकशी केली असता त्याच्याकडे कोणतेही परवान्याचे कागद आढळून आले नाही. पोलीस शिपाई मनोज राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात लंकेश गायकवाड व सचिन पवार याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त नागरिकांना खिचडीचे वाटप करण्यात आले. यावेळी आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर, प्रविण पाटील चिखलीकर, कार्यक्रमाचे संयोजक नवनाथ काकडे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, दर्शनसिंघ सिध्दू यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# गिट्टी अंथरली, पण डांबरीकरणाचा पत्ता नाही; गोकुंद्यात संताप वाढला

किनवट/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील एक कि.मि.लांबीच्या डांबरीकरण करण्यापूर्वी अंथरलेल्या गिट्टीच्या (जीसीबीच्या) पहिल्या थराचे काम पूर्ण झाले. परंतु उर्वरित कामाला कधी गती मिळेल असा नागरिकांचा सवाल आहे. अंथरलेल्या गिट्टीवरुन दुचाकी चालवताना घसरुन पडताहेत. पुर्वी खड्डे, धूळ आणि दूर्गंधीयुक्त पाण्याच्या चिखलामुळे लोकांचे हाल झाले, आता गिट्टीवरुन दुचाकी चालवताना होताहेत. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता तात्काळ कामे केली तरच कामाला दर्जा असेल. पावसाळ्यात डांबरीकरणाची कामे करणे कठीण जाईल म्हणून चक्क कामच बंद ठेवण्याची भिती देखील व्यक्तविली जात आहे.

उड्डाण पुलाच्या बहाण्याखाली गोकुंद्रा शहरातील चक्क कामच बंद ठेवले होते. मारोती सुंकलवाडांनी पंचायत समितीची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून का होईना परंतु आंदोलन छेडल्यामुळे सीसीकरण नको मात्र डांबरीकरण करुन द्या म्हणण्याची वेळ आली. हॉटमिक्स डांबरीकरण केल्यास उड्डाण पुलाच्या आणि सीसीकरणाच्याही आशा मावळतील. केवळ उड्डाण पुलाच्या बहाण्याखाली वर्षानवर्षांपासून या कंत्राटदाराने वेळ गमावून विकासाला ब्रेक लावला. खरे तर अशा कंत्राटदारावर फौजदारी कारवाई करुन काळ्या यादीत टाकायला हवे होते. परंतु किनवटची जनता सामोपचाराने घेते हे विशेष. पुन्हा पुन्हा आंदोलनाची गरज पडू नये यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने आतातरी कंत्राटदारांकडून गोकुंदा शहरातील डांबरीकरणाचे पावसापुर्वी जलदगतीने कामे पूर्ण करुन घ्यावीत अशी मागणी केली जात आहे.



# इंजि.विश्वंभर पवार यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते इंजि. विश्वंभर पवार यांनी हदगाव येथील शिवसंवाद मेळाव्यात खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

भोकर मतदार संघातील सामाजिक, राजकीय क्षेत्रात नावाजलेले व्यक्तिमत्त्व म्हणून इंजि. विश्वंभर पवार परिचित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल स्व. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी अनेकदा घेतली होती. ते जिल्हा नियोजन व विकास समितीचे सदस्य होते, भोकर येथील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी त्यांनी जीवापाड मेहनत घेऊन पक्षाचे संघटन मजबूत केले. अजित दादांच्या निधनानंतर नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघटनात्मक वाढ खुंटल्यामुळे विश्वंभर पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला. हदगाव येथे २८ मे रोजी खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पवार यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आ.हेमंत पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख नांदेड रमाकांत मडावी, माजी खा. आनंद परांजपे, आ. बालाजी कल्याणकर, आ.बाबुराव कोहळीकर, आ. आनंद बोंढारकर यांच्यासह जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, गजानन पाटील आदींची उपस्थिती होती. डॉ. पुरुषोत्तम कल्याणकर, चेतन पाटील सोनारीकर, सरपंच संतोष पाटील चिंचाळकर, रवी गेंट्वार, सिद्धू पाटील चिंचाळकर, विजय पा. सोळंके, राष्ट्रवादी शहराध्यक्ष मोहम्मद बुऱ्हाण यांच्यासह ४५ पदाधिकाऱ्यांनी प्रवेश घेतला.



# पल्लवी हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी.पदवी

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र संकुलातील संशोधक विद्यार्थिनी पल्लवी देवराव हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

पल्लवी हंबर्डे यांनी मोलुक्युलर इंटरक्शन्स न्ड रिलॅक्सेशन स्टडीज ऑफ सीटेट युजिंग ब्रॉडबँड डायलेक्ट्रिक स्पेक्ट्रोस्कोपी या विषयावर भौतिकशास्त्र संकुलातील प्रो. डॉ. अशोक कुंभारखाणे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आपला संशोधन प्रबंध सादर केला होता. दि.२५ मे रोजी त्यांची मौखिकी परीक्षा यशस्वीरित्या पार पडली असून त्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली. या संशोधन कार्यात डॉ. नितीन गरड, डॉ. प्रमोद कोणमारे, डॉ. शिल्पा पतंगे, डॉ. पूजा खानझोडे, गीतांजली जाधव तसेच राजेश पतंगे यांनी मोलाचे सहकार्य केले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, डॉ.अशोक महाजन, कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील, संकुलाचे संचालक डॉ.राजाराम माने यांच्यासह नंदकुमार हंबर्डे, राजेश मोरे, आकाश हंबर्डे, विकास हंबर्डे व संध्या हंबर्डे आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शेतकरी पुत्राची अतिशय मेहनतीने मुंबई पोलीस पदाला गवसणी

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील मौजे आंबुलगा (बु) येथील एका आदिवासी मन्नेरवारलू समाजातील शेतकऱ्याचा मुलगा जेव्हा सरकारी नौकरी मिळवतो तेव्हा त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो. अशाच एका होतकरु शेतकरी पुत्राने जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश मिळविले आहे.



प्राथमिक शिक्षण गावात व माध्यमिक शिक्षण उदगीर येथील सैनिक शाळेत पूर्ण करून लहानपणापासूनच अभ्यासाची आवड असलेल्या निखिल हणमंतराव कल्याणपाडने मुंबई पोलिस भरती मध्ये यश मिळविले. अभ्यासाची आवड आणि पोलीस प्रशासनात नोकरी करण्याची इच्छा यामुळे निखिल ने आपले उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्या नंतर छत्रपती संभाजीनगर येथे राहून पोलीस भरतीच्या तयारीला सुरुवात केली. तयारीला सुरुवात केल्या नंतर अवघ्या दोन वर्षाच्या आतच मुंबई पोलीस येथे निखिलची २०२६ नुकतीच निवड झाली आहे. या यशाबद्दल निखिलचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी माहूर तालुक्यातील अंतिम मतदार यादी जाहीर

माहूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीची रणधुमाळी आता सुरू झाली असून अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यातील सहकार आणि राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. प्रारूप मतदार यादीवरील आक्षेपांवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर विभागीय सहनिबंधकांनी २७ मे रोजी प्रत्येक प्रकरणाचा निर्णय दिला. मंजूर करण्यात आलेल्या अर्जदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

जिल्हा बँकेच्या मतदारांची अंतिम यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली असून जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता सहकार विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. संचालक मंडळाच्या २३ जागांसाठी ही निवडणूक होत असून जिल्हाभरातील राजकीय आणि सहकार क्षेत्राचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. माहूर तालुक्यातून प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था मतदारसंघातून प्रतिनिधित्व करणाऱ्या मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये अडकिने जगदिश विठ्ठलराव, केशवे दीपलक्ष्मी सुजीत, केशवे राजेंद्र नामदेवराव, राठोड मधुकर भानु, जयस्वाल विनोद मोहनलाल, जाधव समाधान बालचंद्र, शेरेकार दत्तात्रय भगवानराव, देशमुख अनंतराव शरदचंद्र, सुरोशे अरविंद संभाजी, भूसारे बंडू शामराव, म. नूर म. उस्मान, येरडलावार प्रतिभा पुरुषोत्तम, पठाण इसाखा, पतंगे बाबाराव वामनराव, पठाण फिरोज खा हैदर खा, मोहिते दत्तराव लालूजी, सैयद सलीम सैयद फरीद, बेहेरे लक्ष्मण सोनबा, देशमुख सचिन वसंतराव, कलाने आनंदराव ग्यानबा, गावंडे अंकिता हेमंतराव, मगरे गोविंद लक्ष्मण, डाखोरे वनिता गजाननराव, चुंबळे रणजीतसिंह, हिंगाळे संतोष, राठोड किसन दामा, जाधव उकंडराव मोहनसिंग, राठोड अरूण बळीराम, जाधव निखिल अर्जुन, खराटे ज्योतिबा जयराम, कदम माणिकराव गणपतराव, सिद्धेवार नंदकिशोर बलवंतराव, रुणवाल अनिल सीताराम, राठोड नारोती लालसिंग, पठाण अमजदखाँ अनवर खान, पडलवार विष्णु दत्ता, चव्हाण ईश्वर दत्तराम आणि घोडेकर कांतराव भिवानी यांचा समावेश आहे. या निवडणुकीत मोठा राजकीय ट्विस्ट निर्माण झाला असून जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी दिलेल्या आदेशामुळे माहूर तालुक्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. निवडणूक प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत दाखल करण्यात आलेला आक्षेप अर्ज मंजूर करत तब्बल १० संस्था प्रतिनिधींना अंतिम मतदार यादीत स्थान देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदी राजश्री पाटील यांची बिनविरोध निवड

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नांदेडच्या ज्येष्ठ क्रीडाप्रेमी, यशस्वी खेळाडू आणि संघटक राजश्री पाटील यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

याच निवडणुकीत माजी आ.मोहन जोशी यांची अध्यक्षपदी तर अनिल वरपे यांची महासचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा यापूर्वी माजी खा. विजय दर्डा यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. आता ही महत्त्वपूर्ण जबाबदारी राजश्री पाटील यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांच्या नेतृत्वगुणांवर, कार्यक्षमतेवर आणि संघटन कौशल्यावर राज्य संघटनेने दाखविलेला विश्वास अधोरेखित झाला आहे. राजश्री पाटील या बालवयापासूनच क्रीडा क्षेत्राशी जोडलेल्या असून त्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर सात राष्ट्रीय पदके मिळवली आहेत. खेळाडू म्हणून यश मिळवतानाच त्यांनी सहकार, शिक्षण, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. उत्कृष्ट नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष मान्यता मिळाली आहे.रिंग टेनिस या खेळाच्या प्रसार व विकासासाठी त्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



# पोलीस ठाण्यात एफआयआर फीडबॅक प्रणालीची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढवून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शहर जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे पोलीस ठाण्यांमध्ये एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अनेकदा नागरिकांकडून गुन्हा नोंदविणे किंवा तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येतात. अशा प्रकारांमुळे सामान्य नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कमी होण्याची शक्यता निर्माण होते. प्रस्तावित एफआयआर फीडबॅक प्रणाली अंतर्गत प्रत्येक एफआयआर किंवा तक्रार नोंद झाल्यानंतर २४ ते ४८ तासांच्या आत पोलीस अधीक्षक कार्यालयातून फिर्यादीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा. यावेळी संबंधित पोलीस ठाण्यातील वागणूक, कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी झाली का, कामकाजाबाबतच्या तक्रारी अथवा सूचना आणि पोलीस सेवेबाबतचे समाधान याविषयी माहिती घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# संगीता गणेशराव बारडकर यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील शिवरायनगर येथील कु.संगीता गणेशराव बारडकर यांचे आज सकाळी ७ वाजता दीर्घ आजाराने राहत्या घरी दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई, वडील, ३ भाऊ, ३ वहिनी, ५ भाची २ भाचे असा परिवार आहे. दैनिक देशोन्नतीचे प्रमोद बारडकर यांच्या त्या ताई होतं.

# अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे माहूर ग्रामीण रुग्णालयच आजारी ;रुग्णांची हेळसांड

माहूर/प्रतिनिधी-आदिवासी व दुर्गम भाग म्हणून ओळख असलेल्या माहूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय स्वतःच गंभीर समस्यांच्या विळख्यात अडकले असून, अपुऱ्या मनुष्यबळामुळे रुग्णसेवा अक्षरशः कोलमडली आहे. वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, स्टाफ नर्स आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त जागांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सध्या ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांचे पद रिक्त असून त्याचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी ओ. एल. साबळे यांच्याकडे देण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर तीन पदांपैकी दोन पदे रिक्त आहेत. त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात दोन डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली असली तरी स्त्रीरोग तज्ज्ञ व भूलतज्ज्ञांची पदे अद्याप रिक्तच आहेत. १८ मे रोजी झालेल्या समुपदेशन प्रक्रियेत सातपैकी पाच स्टाफ नर्सची बदली करण्यात आली. मात्र त्यांच्या जागी अद्याप नवीन नियुक्त्या झालेल्या नाहीत. लॅब टेक्निशियनचे पदही रिक्त असून, गट-अ मधील कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्याला नऊ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांनी कामावर येणे टाळल्याची माहिती समोर आली आहे.

दररोज ३५० ते ४०० रुग्णांची ओपीडी असलेल्या या रुग्णालयात केवळ ३० खाटांची सुविधा आहे. वाढती लोकसंख्या आणि रुग्णसंख्या लक्षात घेता येथे किमान ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. मंजूर ३० कर्मचाऱ्यांपैकी तब्बल १० पदे रिक्त असल्याने उर्वरित २० कर्मचाऱ्यांवर संपूर्ण रुग्णालयाचा भार पडत आहे. कायमस्वरूपी तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे गंभीर रुग्णांना यवतमाळ जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर केले जाते. त्यामुळे गरीब व गरजू रुग्णांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रीय महामार्ग शहरातून गेला असल्याने या मार्गावर अपघातांचे प्रमाण मोठे आहे. मात्र तज्ज्ञ डॉक्टर आणि ट्रॉमा सुविधा नसल्याने अनेक जखमींना वेळेवर उपचार मिळत नाहीत. परिणामी काहींना जीवही गमवावा लागत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

ग्रामीण रुग्णालयातील परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील कंत्राटी डॉक्टरांकडूनच रुग्णसेवा दिली जात आहे. यामुळे गरोदर माता, नवजात शिशू, अंगणवाडीतील बालके आणि शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासण्या खोळंबल्या आहेत. माहूर येथे ट्रॉमा केअर सेंटर आणि उपजिल्हा रुग्णालयाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शासनाच्या ५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक माहिती व प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र आठ वर्षांचा कालावधी उलटूनही ना ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झाले, ना उपजिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला. जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या माहूर शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजार असून तालुक्यातील ९२ गावांतील जवळपास दोन लाख नागरिक आणि




भाविकांसाठी हे एकमेव शासकीय ग्रामीण रुग्णालय आहे. आदिवासी, गोरगरीब व दुर्गम भागातील नागरिकांच्या आरोग्यसेवेचा विचार करता माहूर ग्रामीण रुग्णालयाला तातडीने ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन ट्रॉमा केअर सेंटर मंजूर करावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केली आहे.

# किनवट पोलिस ठाण्यातील तीन कर्मचाऱ्यांना पदोन्नती



किनवट/प्रतिनिधी-किनवट पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस जमादार प्रकाश बोधनवाड, पोलीस शिपाई अनंतवार आणि पोलीस शिपाई राठोड यांच्या पदोन्नतीनंतर त्यांना पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या उपस्थितीत व हस्ते छोटेखानी निरोप देऊन कार्यमुक्त करण्यात आले.

पोलीस जमादार बोधनवाड यांच्यावर कामकाजाची विशेष जबाबदारी सोपविण्यात आल्याचे नेहमीच पहायला मिळाले. पोलीस शिपाई अनंतवार आणि पोलीस शिपाई राठोड यांचीही कामगिरी अत्यंत महत्वाची होती. जनसंपर्क चांगला होता. त्याचा सेवाकाळ लक्षात घेता वरिष्ठ प्रशासनाने पदोन्नती देऊन त्यांच्यावरची जबाबदारी वाढवली हे विशेष.

# पश्चिम बंगालमध्ये पुन्हा टिमसी नेत्यावर हल्ला

कोलकाता:पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि ज्येष्ठ नेते कल्याण बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाल्याचा आरोप समोर आला आहे. यामुळे पुन्हा एकदा पश्चिम बंगालचे वातावरण तापले असून हा हल्ला भाजपकडून करण्यात आला असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसकडून करण्यात आला होता. तर भाजपने ही नोटंकी असल्याचा आरोप तृणमूलवर केला आहे.

पश्चिम बंगालमधून तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील कथित हल्ल्यानंतर आता कल्याण बॅनर्जी यांनीही भाजप कार्यकर्त्यांवर गंभीर आरोप केल्याने राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. हुगली जिल्ह्यातील चंडीतला पोलीस ठाण्यासमोर हा प्रकार घडला. तृणमूल काँग्रेसच्या काही नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना अटक करण्यात आल्याच्या निषेधार्थ त्यांच्या सुटकेची मागणी करणारे निवेदन देण्यासाठी कल्याण बॅनर्जी पोलीस ठाण्यात गेले होते.

पान १ वरुन

## शेतकरी कर्जमाफीची अंमलबजावणी...

सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका आणि पीक कर्ज देणाऱ्या पतसंस्थांनाही मोठा फायदा होणार आहे. शासनाकडून थकीत कर्जाची रक्कम भरली जाणार असल्याने बँकांची थकबाकी वसूल होईल. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या अनेक बँकांची परिस्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मनोज जरांगे यांचे उपोषण...

जरांगे यांनी उपोषण मागे घेतल्याची घोषणा केली.उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांना देण्यात आलेली सर्व आश्वासने पारदर्शकपणे आणि माध्यमांसमोरच देण्यात आली आहेत. मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका राज्य सरकारने सातत्याने घेतली असून त्यानुसारच पुढील कार्यवाही केली जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही सरकार मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले.


## आंतरगाव नदी घाटावर...

नागेश संजय हंबर्डे (वय २०), गोपिनाथ बालाजी हंबर्डे (वय ३६) रा.धनज, गोविंद तुळशीराम शिंदे (वय ३०), मोहन सखाराम शिंदे (वय ३८) विश्वंभर नागोराव शिंदे (वय ४२) रा.आंतरगाव, पांडूरंग हणमंत ईबितवार, बळवंत गोविंद शिंदे, भिवजी सिताराम तोडे, गजानन भाऊराव तोडे, शंकर बाबाराव शिंदे व अन्य एक यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रायगडच्या पालकमंत्रीपदी अखेर भरत गोगावले

## खा.तटकरेंच्या मुलाला विधानपरिषद

मुंबई/प्रतिनिधी-रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीतील दोन घटक पक्षांमध्ये सुरू असलेला वाद अखेर संपुष्टात आला आहे. जवळपास दीड वर्ष रखडलेला हा प्रश्न राजकीय समन्वयातून मार्गी लागला असून, मंत्री भरत गोगावले यांच्याकडे रायगडच्या पालकमंत्रीपदाची धुरा सोपविण्यात येणार असल्याचे निश्चित झाले आहे. तर विधानपरिषदेची जागा शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मुलासाठी सोडली आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी सुरुवातीपासूनच शिवसेनेचे मंत्री तथा महाडचे आमदार भरत गोगावले इच्छुक होते. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या व महिला-बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनीही या पदावर दावा केल्याने महायुतीतच मतभेद निर्माण झाले होते. जिल्ह्यातील विकासकामे, नियोजन समितीवरील नियंत्रण आणि राजकीय प्रभाव लक्षात घेता दोन्ही पक्षांसाठी हे पद प्रतिष्ठेचे मानले जात होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी अदिती तटकरे यांच्या नियुक्तीची घोषणा केली होती.




हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४